सत्यमेव जयते

# NATIONAL INFORMATICS CENTRE, GOA

## Viksit Bharat Sankalp Yatra - Goa

The Honourable Prime Minister, Shri Narendra Modi launched ‘Viksit Bharat Sankalp Yatra’ and Pradhan Mantri Particularly Vulnerable Tribal Groups Development Mission from a program marking the celebrations of Janjatiya Gaurav Diwas, 2023 in Khunti, Jharkhand on 15 November 2023. On this occasion, the Honourable Chief Minister of Goa, Dr. Pramod Sawant flagged off the IEC van (Information, Education and Communication) at a function held at the Secretariat, Porvorim, Goa, thereby marking the launch of Viksit Bharat Sankalp Yatra in the State. The dignitaries present on the occasion included Shri Mauvin Godinho, Minister of Panchayats, Shri Subhash Shirodkar, Minister for Co-operation and Smt. Siddhi Halarnkar, Director of Panchayats. All the dignitaries virtually attended the Janjatiya Gaurav Diwas programme which was held at Khunti in Jharkhand.





*Hon’ble Chief Minister and other dignitaries attending the programme virtually*

In a X post, Goa CM Dr. Sawant said: (https://twitter.com/DrPramodPSawant/status/1724737077995274596)

"Virtually Attended the #JanjatiyaGauravDivas 2023 & Flag off of #ViksitBharatSankalpYatra by Hon'ble Prime Minister Shri @narendramodi Ji on the occasion of Birth Anniversary of Bhagwan #BirsaMunda. Also flagged off the Viksit Bharat Sankalp Yatra from Goa at Porvorim".






*Flag off of Vikasit Bharat Sankalp Yatra Van in Provorim*

In the forthcoming days, the van will travel across the State, including blocks like Canacona, Dharbandora, Mormugao, Ponda, Quepem, Salcete, Sanguem etc.












*Some glimpses from South Goa District*

Officers of NIC Goa State Centre, Shri. James Sebastian Rozario, ASIO, Shri. K.V. Ramanathan, Scientist-E, Shri. K Sampath Kumar, Scientist –C and District NIC officers Shri. G Mahalingum, DIO from North Goa, Shri. Dhanesh KR, ADIO from South Goa coordinated and provided technical support for conducting the entire program under the Guidance of Shri. Sameer P. Datar, SIO, Goa.



# आदिवासींसाठी विकसित भारत यात्रा

## मुख्यमंत्र्यांनी दाखवला झेंडा : २६ जानेवारीपर्यंत मोहीम

**पणजी, ता. १५ (प्रतिनिधी)** : केंद्र सरकारच्या विशेषतः आदिवासींसाठी असलेल्या योजनांची माहिती गावागावात दिली जाणार आहे. यासाठी सरकारने खास वाहनांची व्यवस्था केली असून या मोहिमेस विकसित भारत यात्रा असे नाव देण्यात आले आहे. पर्वरी येथे मंत्रालयासमोर गुलाबी झेंडा दाखवून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी २६ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या मोहिमेची सुरवात केली.

वाहनाच्या दर्शनी भागावर आमचा संकल्प विकसित भारत आणि मोदी सरकारची हमी असे ठळकपणे लिहिले आहे. वाहनाच्या दोन्ही बाजूला असलेल्या एलईडी पडद्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषणे आणि आदिवासींसाठी असलेल्या योजनांची माहिती देणाऱ्या ध्वनिचित्रफिती प्रदर्शित करण्याची सोय आहे.

वाहनावर एक छोटे प्रदर्शनही मांडण्यात आले आहे. ढोल ताशांच्या गजरात या वाहनाला मुख्यमंत्र्यांनी झेंडा दाखवला. यावेळी पंचायतमंत्री माविन गुदिन्हो, जलसंपतामंत्री सुभाष शिरोडकर, आमदार प्रेमेंद्र शेट आदी उपस्थित होते. त्याआधी मुख्यमंत्र्यांनी वाहनाची पूजा केली.

या यात्रेला सुरवात करण्याआधी पंतप्रधान मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्माण करण्याची शपथ दृकश्राव्य माध्यमातून दिली. मंत्रालयात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मंत्री सुदिन ढवळीकर, रवी नाईक, सुभाष फळदेसाई, माविन गुदिन्हो, नीळकंठ हळर्णकर, सुभाष शिरोडकर यांनी ती शपथ घेतली.

### चिखलीतून यात्रेची सुरवात

मुख्यमंत्री म्हणाले की, २६ जानेवारीपर्यंत देशभरातील २२० जिल्ह्यांत अशी यात्रा फिरणार आहे. दक्षिण गोव्यातील चिखली पंचायत क्षेत्रातून यात्रेची सुरवात होईल. एका गावात तीन तासांत केंद्र सरकारच्या योजनांची माहिती दिली जाईल. अर्ज दिले जातील. अर्ज स्वीकारले जातील. प्रत्येक पंचायत क्षेत्रात ३ तास वाहन थांबेल. लोकांनी सगळ्या योजना समजून घ्याव्यात. गावात कधी हे वाहन येईल हे पंचायतीला आगावू कळवले जाईल. गावात स्वयंपूर्ण मित्र यात्रेचे स्वागत करतील. सरपंच, सचिव, पंच यावेळी उपस्थित राहतील. सरकार अंत्योदय तत्त्वावर काम करण्याची केवळ घोषणा करत नाही तर समाजाच्या सर्वात शेवटच्या घटकाला सरकारी योजनेचा लाभ देण्यासाठी गावागावात जाते. पंतप्रधान विश्वकर्मा योजना सगळ्यांपर्यंत पोचवण्यासाठी या यात्रेचा उपयोग होणार आहे.

### पंचायतींना अभिनंदन पत्र

मुख्यमंत्री म्हणाले की, हर घर जल मोहीम यशस्वी करण्यात पंचायतींचे मोठे योगदान आहे. राज्य हागणदारीमुक्त करण्यासाठी पंचायतींनी पुढाकार घेतला आहे. या दोन्ही कामांसाठी दिलेल्या योगदानाची दखल घेण्यासाठी मुख्यमंत्री व पंचायत मंत्र्यांच्या सहीचे अभिनंदन करणारे पत्र पंचायतींना पाठवण्यात येणार आहे.

The event was covered by local news.